# इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या काळातील भारतीय महिलांचे सशक्तीकरण : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. गोवर्धन रुक्मिणीबाई कृष्णाहरी दिकोंडा** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, ता. माढा, जि. सोलापूर – ४१३२०९ मोबाईल – ९०२१२०७३३६ ईमेल – govardhan.docs@gmail.com

---

**गोषवारा :**

महिलांचे सशक्तीकरण होणे आवश्यक आहे असे आपण भारतात आज काल विविध माध्यमातून समजून घेत आहोत तथा त्याबाबत विविध ठिकाणी चर्चासत्र सुद्धा होत आहेत. पंरतु भारतातील महिलांच्या सशक्तीकरणात महिला सशक्तीकरण करण्यासाठी सर्वात मोठा वाटा हा ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश पार्लमेंटचा आहे हे विसरता येणार नाही. ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश पार्लमेंटने भारतीय महिलांच्या संदर्भात ज्या ज्या ठिकाणी निसर्गाने जन्मत:च दिलेल्या आत्मसन्मान, हक्क व अधिकार समस्या उभी राहिली होती. त्या त्या ठिकाणी आवश्यक असे कायदे म्हणजे सती प्रथा, विधवा पुनर्विवाह कायदा, भारतीय वारसा हक्क अधिनियम, स्त्री भ्रूण हत्या, विशेष विवाह कायदा, संमती वय कायदा या अशा कायद्यांद्वारे महिलांचे सशक्तीकरण केले आहे. महिलांनी या कायद्यांच्या आधारे निसर्गाने जीवन जगण्याचा दिलेल्या हक्क व अधिकाराचे आदर करत या काळात मुक्त व स्वतंत्रपणे स्वत:च्या विचाराने जगायला सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांना देशात आणि विदेशात उच्च शिक्षण घेता आले तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी महत्त्वाच्या प्रसंगी सहभाग होऊन आपण महिला कुठेही कमी नाही हे सिद्ध करता केले आहे. काही महिला स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिकारी झाल्या, काही महिला अहिंसक मार्गाने दारू व विदेशी कपड्यांच्या दुकानसमोर बिनधास्त व धाडसीवृतीने निदर्शने करता आले. काही महिला लष्करी भूमिकेतून स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते, काही महिला संस्था, संघटना, वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ चालविल्या होते. त्यांच्या या विविध ठिकाणच्या सहभागामुळे भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले आहेच त्याबरोबर त्या स्वत: सशक्त होऊन आपल्या समवेत इतरही महिलांना सशक्त करण्यासा प्रेरणा व प्रोत्साहन दिले आहे.

**सूचक शब्द :** ईस्ट इंडिया कंपनी, ब्रिटिश पार्लमेंट, राणीचा जाहीरनामा, कायदे, चळवळ

**प्रस्तावना :**

भारतात आज २१ व्या शतकात विविध ठिकाणी भारतीय महिलांचे सशक्ती होणे आवश्यक आहे असे चर्चासत्र, परिषद आणि सोशल मिडिया माध्यमातून चर्चा होत असल्याचे पाहत आहोत. पंरतू भारतीय महिलांचे सशक्तीकरण इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात कायदेशीर मार्गाने आणि विविध आंदोलने चळवळ द्वारे घडून आले आहे. भारतीय महिलांचे सशक्तीकरण होण्यासाठी या आधुनिक जगात भारताचे पहिले समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी पुढाकार घेतला आहे. राजा राममोहन रॉय यांनी महिलांना निसर्गाने जन्मत:च दिलेल्या जगण्याचा हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी शेकडो वर्षे रूढी, प्रथा, परंपरा नावाने चाललेली सती प्रथा कायदेशीर मार्गाने ईस्ट इंडिया कंपनीच्या द्वारे बंद केली आहे. या प्रमाणे भारतीय महिलांच्या संदर्भातील अनेक कायदे १९ व्या शतकात महिलांच्या संदर्भात कार्य करणारे काही पुरुष समाजसुधारक पुढाकार घेऊन कायदे करून घेतले आहेत. पण २० व्या शतकात मात्र महिला स्वत: सजग सुशिक्षित झाले असल्यामुळे महिलांच्या सशक्तीकरणासाठी आवश्यक असलेले कायदे ब्रिटिश पार्लमेंट द्वारे आणि स्थानिक विधिमंडळद्वारे कायदे करून घेतले आहे. यात विशेषत: महिलांना लोकशाहीच्या राजकीय व्यवस्थेत महिलांना पुरूषांप्रमाणे मतदानाचा व निवडणुकीत सहभाग होण्याचा हक्क व अधिकार स्वत:हून स्वत: प्राप्त करून घेतला आहे. भारतीय महिलांचे १९ व्या व २० व्या शतकातील कायद्यांद्वारे आत्मसन्मान, हक्क व अधिकार प्राप्त होऊन सशक्तीकरण झाले आहे. त्याद्वारे त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आहे. भारतीय महिलांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी भगत सिंग सारखे क्रांतिकारी सारख्या हिंसक लढा असो, महात्मा गांधीजींच्या सत्य व अहिंसक लढा असो, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या लष्करी लढा असो, अशा विविध स्वरुपात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात योगदान दिले आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेल्या हजारो महिलांनी आपल्या समवेतच्या इतरही महिलांना प्रोत्साहित करून त्यांनाही महिला सशक्तीकरणात समावेश करून घेतला आहे.

**उद्दिष्ट्ये** :

1. इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या काळातील महिलांचे सशक्तीकरणाचे कायदे अभ्यास करणे.
2. महिलांच्या सशक्तीकरणासाठी पुढाकार घेतलेल्या पुरुष समाजसुधारकांच्या कार्यावर विचार करणे.
3. इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या काळातील महिलांचे महिला सशक्तीकरणावर प्रकाश टाकणे.
4. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही प्रमुख महिलांचे भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेले कार्य तसेच सशक्तीकरणाचे कार्य विचारात घेणे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन लेख हा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करुन इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या काळातील महिलांचे सशक्तीकरणाचे कायदे, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही निवडक प्रमुख महिलांचे महिलांच्या सशक्तीकरणाच्या योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी तज्ञ व विद्वान अभ्यासक, संशोधक व विचारवंत यांच्या लेखन साधनावर आधारीत पुस्तके, ग्रंथ, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय जर्नल मधील संशोधन लेख या दुय्यम साधनांचा अभ्यास करून संशोधन लेख पूर्ण केला आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ईस्ट इंडिया कंपनीचा काळ (इसवी सन १७६४ ते इसवी सन १८५८)
2. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ब्रिटिश पार्लमेंटचा काळ (इसवी सन १८५८ ते इसवी सन १९४७ )
3. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ईस्ट इंडिया कंपनीचा काळ (इसवी सन १७६४ ते इसवी सन १८५८)

भारतीय स्वातंत्र्य चळवळ काही काळ ईस्ट इंडिया कंपनी आणि काही काळ ब्रिटिश पार्लमेंटच्या अधिपत्याखाली चालली होती. ईस्ट इंडिया कंपनीचे भारतात इसवी सन १६०० मध्ये आगमन झाले असले तरी त्यांचे अधिकृत शासन काळ इसवी सन १७६४ च्या बक्सारच्या युद्धाच्या विजयानंतर सुरू झाले आहे. त्यामुळे त्यांचे भारतातील खरे प्रशासकीय व राजकीय कालखंड इसवी सन १७६४ पासून सुरू होतो व इसवी सन १८५७ च्या उठावामुळे १ नोव्हेंबर १८५८ रोजी ब्रिटिश राणी एलिझाबेथ यांच्या जाहीरनाम्याने ईस्ट इंडिया कंपनीचे भारतावरील प्रशासकीय आणि राजकीय नियंत्रण संपुष्टात येते.

इसवी सन १७६४ पासून तथा त्या आधी काही काळापासून ईस्ट इंडिया कंपनीला भारतातून हद्दपार करणेसाठी काही छोट्या छोट्या क्रांतिकारी घटना आदिवासी व विविध संस्थांनिकांच्या माध्यमातून घडून येत होते. परंतु भारतातील भारतीयांच्या काही संस्थांनिकांच्या एकमेकांच्या युद्धांमुळे ईस्ट इंडिया कंपनीला भारतातून हद्दपार करता आले नाही. म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आरंभ हा इसवी सन १७६४ पासूनच सुरू होतो असे गृहीत धरले जाते.

इसवी सन १७६४ ते इसवी सन १८५८ कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीचे महिलांसाठीचे धोरण

इसवी सन १७६४ ते इसवी सन १८५८ कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीने महिलांसाठी अतिशय उदारमतवादी धोरण राबवून महिलांच्या सशक्तीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण व क्रांतिकारी कायदे केले आहेत ते कायदे आजही अंमलात आहेत.

**महिलांसाठी केलेले कायदे**

- इसवी सन १८२९ सती प्रथा बंदी कायदा

महिलांच्या न्याय हक्कासाठी सर्वप्रथम भारताचे आद्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी सतीची प्रथा बंद होण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीला अनेक ऐतिहासिक संदर्भ निदर्शनास आणून देऊन भारतातील शेकडो वर्षापासून चालू असलेली अनिष्ठ सती प्रथा इसवी सन १८२९ मध्ये सती प्रथेची बंदी कायदा करून भारतात पुर्णपणे सतीप्रथेचे निर्मूलन केले आहे. ईस्ट इंडिया कंपनीने महिलांच्या सशक्तीकरणाचे असे अनेक कायदे करून त्यांना त्यांचे निसर्गाने दिलेल्या हक्क आणि अधिकाराचे जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला आहे.

- इसवी सन १८५६ विधवा पुनर्विवाह कायदा

इसवी सन १८५६ मध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी महिलांच्या विधवा पुनर्विवाहासाठी लढा उभारून विधवा पुनर्विवाह कायदा ईस्ट इंडिया कंपनीच्या द्वारे करून घेऊन ज्या महिलांचे अतिशय बालवयात विवाह होऊन वैधव्य प्राप्त झाले आहे. त्या महिलांना त्यांचे उर्वरित आयुष्य निसर्गाने जगण्यासाठी दिलेल्या हक्काचे आनंदाने पुनः जगता यावे यासाठी विधवा पुनर्विवाह कायदा पारित करून घेऊन महिलांचे अधिक सशक्तीकरण होण्यासाठी योगदान दिला आहे.

महिलांसाठी शिक्षणाचे सुरुवात

ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखालील तत्कालीन बंगाल व बॉम्बे प्रांतात काही ठिकाणी या काळात महिलांच्या शिक्षणाच्या संदर्भात काही प्रमाणात सुरुवात झाली होती. पुणे येथे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी इसवी सन १८४८ मध्ये फातिमा शेख यांच्या घरी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली होती. यासाठी त्यांनी भारतातील पहिली शिक्षिका आणि मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई फुले यांची नियुक्ती केली आहे. यासोबतच फातिमा शेख या सुद्धा शिक्षिका म्हणून याच कालावधीत कार्य करायला सुरू केले होती. थोडक्यात महिलांच्या सशक्तीकरणात शिक्षणाचे महत्त्व ओळखून महात्मा फुले यांनी महिलांना शिक्षिका करून महिला सशक्तीकरणात महत्त्वाचे योगदान दिले आहे. महिलांच्या शिक्षणामुळे पुढील काळात भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. १८ जुलै १८५७ रोजी विद्यापीठ स्थापन करण्याच्या कायद्यामुळे भारतात प्रथमच मद्रास बॉम्बे आणि कलकत्ता येथे लंडन विद्यापीठाच्या धरतीवर विद्यापीठ स्थापन झाले आहे. यामुळे महिलांना त्यांच्या त्यांच्या प्रांतात पुढील काळात सहजपणे पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पर्यंतचे उच्च शिक्षण घेता आले.

**१८५७ च्या उठावाच्या पूर्वी आणि १८५७ च्या उठावात महिलांचे सहभाग**

ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातच ईस्ट इंडियाच्या विरोधात इसवी सन १८५७ मध्ये मोठ्या प्रमाणात उठाव झाला होता. या उठावात झाशी येथील राणी लक्ष्मीबाई, झलकरीबाई, बेगम हजरत महल, तपस्विनी महाराणी, रामगढ येथील राणी यांनी आपापले संस्थान वाचविण्यासाठी प्रसंगी तलवार हातात घेऊन लष्करी वेशभूषेत ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याविरूध्द मोठ्या प्रमाणात अतिशय निकराचा लढा दिला आहे. यापूर्वी भीमाबाई होळकर, महाराणी वेळू नचियार या महिला सुद्धा ईस्ट इंडियाच्या लष्करी अधिकारी व सैन्याविरुध्द लढा दिला होता. या महिलांनी याकाळात जे वीरत्व दाखवली आहे ते एक प्रकारचे महिला सशक्तीकरणासाठी उचलले महत्त्वपूर्ण पाऊल होते असे म्हणायला हरकत नाही.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ब्रिटिश पार्लमेंटचा काळ (इसवी सन १८५८ ते इसवी सन १९४७ )**

१ नोव्हेंबर १८५८ रोजी ब्रिटिश राणी एलिझाबेथ यांच्या जाहीरनाम्याने भारतात प्रत्यक्ष ब्रिटिश पार्लमेंटचे राज्य सुरू झाले. यामुळे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारतासाठी एक भारतमंत्री पद आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट ऑफ इंडिया नावाचे कार्यालय सुरू झाले. तसेच गवर्नर जनरल या पदाचे पद रद्द होऊन व्हाईसरॉय हे पद अस्तित्वात आले.

इसवी सन १८५८ ते इसवी सन १९४७ पर्यंत भारतीय स्वातंत्र्य चळवळ मोठ्या प्रमाणात तीव्रतेने चालले होते. या प्रदीर्घ कालखंडात अनेक पुरूषांनी इसवी सन १८५२ पासून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी विविध माध्यमातून कार्य सुरू केले होते. त्यांचे हे कार्य वृत्तपत्राद्वारे, पुस्तके, ग्रंथ व इतर लेखन साधनांद्वारे प्रभावीपणे सुरू होते. त्यांच्या लेखन साधनांद्वारे फक्त चूल आणि मूल असे समजणाऱ्या महिलांना भारताच्या स्वातंत्र्यासाठी सुरू असलेल्या चळवळीचे बातम्या व इतर प्रकारचे सुधारणात्मक गोष्टी लक्षात येत होते. काही महिला भारताच्या स्वातंत्र्यासाठी पुढाकार घेतलेल्या पुरुषांच्या घरातील असल्यामुळे त्या महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आणि समाज सुधारणात्मक कार्यामध्ये सहभाग घेतला आहे.

**इसवी सन १८५८ ते इसवी सन १९४७ या काळातील कायदे**

- कामगारांच्या कराराचा कायदा १८५९

या कायद्याद्वारे जिथे जिथे कामगारांचा विशेषत: महिला कामगारांचा शोषण होत होता त्यांच्यासाठी सन्मानान कामाच्या ठिकाणी काम करता यावे, त्यांना ठरल्याप्रमाणे वेतन मिळावे, त्यांना कामाच्या वेळेच्या बाबतीत सवलत मिळावे व इतर आनुषंगिक छळापासून मुक्तता मिळावे या करीता ब्रिटिश पार्लमेंटने इसवी सन १८५९ मध्ये कामगारांच्या कराराचा कायदा केला आहे.

- भारतीय वारसा अधिकार अधिनियम १८६५

या कायदाद्वारे महिलांना आपल्या पूर्वजनांकडून प्राप्त होत असलेल्या संपत्तीमध्ये समान अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यामुळे महिलांना त्यांच्या पूर्वजनांकडील आर्थिक आणि मालमत्ता संबंधित संपत्ती मध्ये समान हक्क आणि अधिकाराचे कायदेशीर वारसा हक्काचे संरक्षण मिळवून देऊन ब्रिटीशांनी महिलांचे आर्थिक व मालमत्ता दृष्ट्या वारसा हक्काचे कायदेशीर अधिकार देऊन सशक्तीकरण केले आहे.

- इसवी सन १८७० स्त्री भ्रूण हत्या

मुलगी नको म्हणून मुलींची हत्या करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने इसवी सन १८७० मध्ये स्त्री भ्रूणहत्या कायदा करून अनेक मुलींचे जीवन वाचविले आहे. कदाचित याच नकोशी असलेल्या मुली पुढील काळात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते असे म्हणावयास हरकत नाही.

- विशेष विवाह अधिनियम १८७२

भारतात अनेक जाती धर्म आहेत. त्या प्रत्येक जाती धर्माचे स्वतंत्र आचार, विचार, रूढी, प्रथा आणि परंपरा आहेत. या काळात काही प्रमाणात आंतर जातीय आणि आंतर धर्मीय विवाह होत होते. परंतु सामाजिक स्तरावर या आंतर जातीय आणि आंतर धर्मीय विवाह संदर्भात मोठ्या प्रमाणात टीका टिप्पणी होत होते आणि काही प्रमाणात हिंसक घटना सुद्धा घडून येत होते. या आंतर जातीय आणि आंतर धर्मीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना विशेषत: महिलांना कायदेशीर संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून ब्रिटीशांनी महिलांच्या सशक्तीकरणासाठी हा विशेष विवाह अधिनियम १८७२ मध्ये कायदा केला आहे.

- विवाहित महिला संपत्ती अधिनियम १८७४

या कायद्यापूर्वी महिलांना विवाहानंतर त्यांच्या वैयक्तिक म्हणजे विवाहात विवाहप्रसंगी आई, वडील भाऊ आणि पाहुण्यांकडून मिळालेल्या आर्थिक व वस्तू स्वरुपातील संपत्तीवर कोणताही अधिकार नव्हता. महिलांच्या या संपत्तीवर फक्त त्यांच्या पतीचा अधिकार होता व त्या संपत्तीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार सुद्धा पतीचा होता. त्यामुळे विवाहित महिलांना त्यांच्याच संपत्तीवर अधिकार नसल्यामुळे त्यांना सन्मानाने जीवन जगता येत नव्हते. विवाहित महिलांचे संपत्ती विवाहित महिलांकडेच राहावे, त्यावर त्यांचेच नियंत्रण राहावे आणि त्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे खर्च करता यावे किंवा योग्य त्या प्रमाणे उपयगो करता यावे म्हणून ब्रिटीशांनी इसवी सन १८७४ मध्ये विवाहित महिलांना त्यांच्या संपत्तीचे संरक्षण करून सशक्तीकरणासाठी विवाहित महिला संपत्ती अधिनियम करून सन्मान मिळवून दिला आहे.

- संमतीचे वय कायदा १८९१

भारतात तत्कालीन काळात मोठ्या प्रमाणात बाल विवाह होत होते. त्यामुळे लहान वयातील बाल विवाहामुळे मुली तथा महिलांना लैंगिक दृष्ट्या अडचणी ठरत असल्याने काही सामाजिक सुधारकांनी मुलींच्या आणि मुलांच्या विवाहाच्या वयाबाबतीत योग्य वय ठरविणे आवश्यक होते. त्यामुळे ब्रिटीशांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करून मुलीच्या वयाच्या १२ व्या वर्षांनंतर संमतीने वैवाहिक संबंध असतील असे कायदा केला होता. संमतीचा वय कायदामुळे महिलांना त्यांच्या वयाचे व परिपक्वतेचा काळ परिपूर्ण होईपर्यंत बाल विवाह होणार नाहीत याची काळजी घेतली होती. यामुळे महिलांच्या सशक्तीकरणात खूपच मोलाचे भर पडले होते.

उपरोक्त महत्त्वाचे कायदे या कालावधीत झाल्यामुळे अनेक महिलांना मोठ्या प्रमाणात त्यांच्या वैयक्तिक जीवनात मुक्तपणे स्वतंत्र विचाराने जगण्याचा हक्क व अधिकार प्राप्त झाला होता. त्यामुळे कित्येक महिला भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान देताना काही महिला मोठ्या प्रमाणात आपले दगदागिने, पैसे आणि इतर स्वरुपातील देणगी दिले होते. त्यांना या कायद्यामुळे कोणीही अडवू शकले नाही. या कायद्यांमुळे महिलांना भारतातील नेहमीचे चूल आणि मूल जबाबदारी सोडून परदेशात जाऊन शिक्षण घेता आले. विविध महिला संस्था संघटना स्थापन करता आले, वृत्तपत्र मासिके रेडिओ चालविता आले.

**इसवी सन १८५८ ते इसवी सन १९४७ या काळातील महिलांचे शिक्षणाचे प्रगती**

- इसवी सन १८७९ मध्ये जॉन एलिएट ड्रिंक वॉटर बैथून यांनी भारतातील पहिले महिला कॉलेज स्थापन केले होते.
- इसवी सन १८८३ मध्ये चंद्रमुखी बसू आणि कादंबिनी गांगुली भारतातील पहिल्या महिला पदवीधर झाले होते.
- इसवी सन १८८६ मध्ये कादंबिनी गांगुली आणि आनंदीबाई जोशी पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण घेऊन पहिले महिला डॉक्टर होण्याचा मान प्राप्त केला होता.
- इसवी सन १९१६ मध्ये धोंडो केशव कर्वे यांनी पुणे येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी नावाने महिलांसाठी भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन केले होते.

**महिलांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग आणि कार्ये**

भारतात महिलांच्या सशक्तीकरणासाठी ब्रिटीशांनी ज्या ज्या ठिकाणी महिलांच्या आत्मसन्मान, हक्क आणि अधिकार संदर्भात समस्या उभी राहिली होती त्या त्या ठिकाणी योग्य ते कायदे पारित करून त्यांना त्यांचे नैसर्गिक आत्मसन्मान, हक्क आणि अधिकार मिळवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत बिनधास्त आणि बेधकडपणे धाडसीवृत्तीने वेगवेगळया माध्यमातून सहभाग घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. यात ज्या ज्या महिलांनी सहभाग घेतला होता त्यांनी ज्यांचे विचार स्वातंत्र्य प्राप्तीसाठी योग्य वाटत होते त्या त्या विचारानुसार त्या त्या नेतृत्वाखाली तन, मन, धन झोकून देऊन कार्य केले आहेत. काही महिला संसदीय आणि सभ्य पद्धतीने ब्रिटीशांनी लढा दिला, काही महिला क्रांतिकारी विचाराने प्रेरित होऊन क्रांतिकाऱ्यांच्या समवेत कार्य केले आहेत, काही महिला महात्मा गांधीजींच्या अहिंसक विचाराने प्रेरित होऊन पुर्णपणे खादी व चरखा द्वारे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कार्य केले आहे आणि काही महिला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सैन्यात सहभागी होऊन कार्य केले आहे. काही विदेशी महिला भारतीय महिलांना लोकशाही पद्धतीच्या राजकीय कामकाजात सहभागी होता यावे म्हणून मतदान आणि निवडणूक चे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहे, यामध्ये काही प्रमुख भारतीय महिलांचा व पुरूषांचा समावेश होता.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही प्रमुख महिला**

- सरोजिनी नायडू (इसवी सन १८७९ – १९४९)

सरोजिनी नायडू यांना भारताचा 'नाईट इंगल' म्हणून ओळखले जाते, त्या एक प्रसिद्ध कवियित्रि होत्या.
सरोजिनी नायडू खिलाफत चळवळ, दांडी सत्याग्रह आणि चलेजाव चळवळीत सहभाग घेतला होता. सरोजिनी नायडू इसवी सन १९२५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या महिला अध्यक्षा म्हणूनही काम केले आहे.

- मादाम भिकाजी कामा (इसवी सन १८६१-१९३६)

मादाम भिकजी कामा या स्वयंस्फूर्तीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या होत्या. त्यांनी
आपल्याकडील सर्व दागदागिने काही रक्कम भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी दिले होते. मादाम कामा या क्रांतिकारी विचाराने प्रेरित होऊन देश विदेशातील भारतीय क्रांतिकारकांच्या संपर्कात राहून स्वातंत्र्य चळवळ चालू ठेवला होता. मादाम कामा या १९०८ मध्ये जर्मनीच्या स्टुअर्टगार्ड येथील आंतरराष्ट्रीय सामाजिक परिषदमध्ये भारताचा पहिला ध्वज फडकावला होता.

- एनी बेझंट (इसवी सन १८२७-१९३३)

एनी बेझंट या आयरीश महिला होत्या. त्या आयर्लंडच्या धरतीवर भारतात इसवी सन १९१६ मध्ये होम रूल
चळवळ सुरू केले होते. त्या आधी त्या थिओसोफिकल सोसायटीचे सदस्य म्हणून भारतात काम करायला सुरुवात केली होती. त्या भारतात काही ठिकाणी विशेषत: महिलांच्या संदर्भात शाळा, महाविद्यालय स्थापन केल्या होत्या. तसेच न्यू इंडिया नावाचे वृत्तपत्र चालविले होते. त्या इसवी सन १९१७ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा म्हणून काम पाहिले आहे. याशिवाय त्या भारतीय महिलांना लोकशाही पद्धतीच्या राजकीय पद्धतीत मतदान आणि निवडणूकीच्या सहभागात पुरुषांच्या प्रमाणे समान हक्क व अधिकार मिळण्यासाठी चळवळ सुरू केली होती. एनी बेझंट यांच्या या प्रयत्नामुळे पुढील काळात भारतीय महिलांना मतदान आणि निवडणुकीत सहभाग होता आले.

- अरुणा असफ अली (इसवी सन १९०९-१९९६)

अरुणा असफ अली या महात्मा गांधीजींच्या सत्य आणि अहिंसक विचाराने प्रेरित होऊन भारतीय स्वातंत्र्य
चळवळीत सहभागी झाले होते. अरुणा असफ अली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या क्रियाशील सदस्य होत्या. त्या सविनय कायदेभंग, दांडी सत्याग्रह या आंदोलनात सहभाग घेतला होता. त्या काही काळ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे इन्कलाब या मासिकेचे संपादक म्हणून काम केले होते. १९४२ च्या चलेजाव चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन बॉम्बे येथील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कार्यालयाच्या ठिकाणी भूमिगत राहून भारताचा ध्वज फडकविला होता. तसेच भूमिगत राहून चले जाव चळवळीत सहभाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना भूमिगत रेडिओ चालवून भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले होते.

- उषा मेहता (इसवी सन १९२०-२०००)

उषा मेहता या महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग नोंदवला. त्या

अरुणा असफ अली यांच्या समवेत चले जाव चळवळीच्या भूमिगत रेडिओ प्रसारण करण्यात महत्त्वाचे भूमिका बजावले होते.

या उपरोक्त महिला प्रमाणे कमला नेहरू, स्वरूपाराणी देवी, विजयलक्ष्मी पंडित, उदा देवी, कस्तुरबा गांधी, इंदिरा गांधी, मिराबेन, नीली सेनगुप्ता, राजकुमारी अमृत कौर, कॅप्टन लक्ष्मी सहगल, राणी गिडीनलियू, सुचेता कृपलानी, सरलादेवी चौधरानी, दुर्गाबाई देशमुख यासारखे कित्येक गणना करू शकत नाही असे महिला अगदी दुर्गमातील दुर्गम भागातील आदिवासी प्रदेशातून सुद्धा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. या सर्व धाडसी सहभागी महिलांचे नोंद या संशोधन लेखात लेखन मर्यादेमुळे समाविष्ट करणे शक्य नाही. परंतु ज्ञात आणि अज्ञात या सहभागी महिलांनी स्वत: सक्षम होऊन सशक्त झाले आणि आपल्या आजूबाजूच्या, परिसरातील नातेवाईक महिलांना सशक्तीकरण करण्यासाठी पुढाकार घेऊन त्यांना सुद्धा पुरूषांप्रमाणे निसर्गाने जन्मत: दिलेल्या हक्क अधिकारांचा आपल्या वैयक्तिक आत्मसन्मानासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिले आहे.

**निष्कर्ष :**

७८ वर्ष पूर्ण केलेल्या आजचा स्वतंत्र भारत इसवी सन १८०० ते इसवी सन १९४७ या ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या अधिपत्याखाली नियंत्रित होता. ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या अधिपत्याखाली भारत नियंत्रित असला तरी त्यांनी भारतीय महिलांच्या सशक्तीकरणाच्या संदर्भात भारतीय महिलांना निसर्गाने जन्मत:च दिलेल्या जगण्याचा हक्क आणि अधिकार कायदेशीर रित्या देऊन त्यांना अधिक बळकट व सक्षम केले होते. भारतीय महिला या कायद्याद्वारे प्राप्त हक्क आणि अधिकारांमुळे निर्भय, धाडसी आणि बेधडक व्यक्तिमत्त्व व निडर झाल्या. त्यामुळे भारतीय महिलांना आपल्या आवडीनुसार उच्च शिक्षण घेता आले, आपल्या पसंतीनुसार योग्य वयात योग्य त्या व्यक्तीशी विवाह करता आले, आपल्या वैचारिक परिपक्वतेनुसार विविध विचारांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होता आले. भारतीय महिला सर्वप्रथम स्वत: सक्षम व सशक्त झाले आणि आपल्या समवेतच्या इतरही अशक्त, दुर्बल महिलांनाही सशक्त होण्यास प्रेरणा दिली व प्रोत्साहित केले आहे. ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या भारतीय महिलांच्या संदर्भातील कायदे स्वरुपातील सकारात्मक दृष्टीकोण व स्वत: भारतीय महिलांचा देशाच्या प्रती असेलेली निष्ठा या दोनही बाबींच्या माध्यमातून भारतीय महिलांचे सशक्तीकरण झाले आहे असे म्हणावयास हरकत नाही.

**संदर्भ :**

1. आचार्य धनंजय, आधुनिक भारत (१५२६-१९४७), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, एप्रिल २००६.
2. कोलारकर श. गो., आधुनिक भारत (१७६०-१९५०), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००४.
3. सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, २००९.
4. फडके य. दि., २० व्या शतकातील महाराष्ट्र खंड १ ते ८, मौज प्रकाशन, मुंबई, २००७.
5. जावडेकर शं. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९४.
6. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९२०), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, एप्रिल २००६.
7. https://www.hercircle.in/engage/get-inspired/achievers/a-brief-history-of-women-rights-freedom-and-gender-equality-in-india-1071.html
8. M. Rama Gopal, Prominent Women Freedom Fighters of India, International Journal of Academic Research, Vol. 2, Issue-4(6), October-December 2015.
9. Jaishree, The Role of Women in Indian Freedom Struggle (1857-1947), Paripex-Indian Journal of Research, Vol. 11, Issue-09, September – 2022
10. Maratha Shrinivas, Female Social Reformers of India : A Special References to Pre-Independence, Journal of Emerging Technologies and Innovative Research, Vol. II, Issue-2, February 2024.

11. Sumanta Bhattacharya, Impactful role of women for freedom struggle in India and their contribution, World Journal of Advanced Research and Reviews, Vol. 12, Issue-3, 2021.
12. Singh Agni, Women's Part in The Indian Independence Movement, AIJRA, Vol. IV, Issue I, 2015.
13. Pooja, Role of Indian Women in Freedom Movement of India, IJRESS, Vol. 13, Issue 8, August 2023.
14. Pal Rina, Role of Women in Indian Freedom Struggle (1905-1927), AIJSS.